ePaper

“बुलडोझर बुद्धी”, महुआ मोइत्रांची योगी आदित्यनाथ यांच्यावर बोचरी टीका





वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™




नगरसेविकेच्या पतीवर हल्ला; जीवे मारण्याची धमकी

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 21 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## सरकारचा कारवाईचा इशारा, महत्वाच्या सेवा पडणार बंद?

# सतरा लाख सरकारी कर्मचारी संपावर!

महाईन्यूज । मुंबई

**विविध मागण्या दोन वर्षे प्रलंबित ठेवल्याबाबत राज्य शासकीय, निमशासकीय, शिक्षक, शिक्षकेतर व चतुर्थ श्रेणी असे सुमारे १७ लाख कर्मचारी उद्या मंगळवारपासून बेमुदत संपावर जात आहेत. यामुळे शासकीय विभाग, शाळा आणि रुग्णालयांना मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या पार्श्वभूमीवर संपात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांची गैरवर्तणूक मानून कारवाई करण्याचा इशारा सरकारने दिला आहे.**

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना आणि राज्य सरकारी गट -ड (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ या दोन संघटनांनी संपासंदर्भात नोटीस दिली होती. सुधारीत निवृत्ती योजना १ मार्च २०२४ पासून लागू केली, मात्र त्याची अधिसूचना काढली नाही. परिणामी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीविषय कोणतेही लाभ मिळत नाहीत, अशी संघटनाची मुख्य तक्रार असल्याचे सरकारी -निमसरकारी, शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीचे विश्वास काटकर म्हणाले.




### कारवाईचा इशारा

सामान्य प्रशासन विभागाने या संपासंदर्भात परिपत्रक काढले आहे. संपामध्ये सहभागी होणे, ही बाब गैरवर्तणूक समजण्यात येईल व अशा कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. काम नाही वेतन नाही, हे धोरण अनुसरले जाईल. ज्या शासनाच्या सेवा महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा अधिनियमांतर्गत घोषित आहेत, संपावर जातील त्यांच्याविरोधात सदर नियमांतर्गत कार्यवाही केली जाईल. संपकाळात विभागप्रमुखांनी मुख्यालय सोडू नये. संपकाळात रजा देऊ नये. संपकाळात कार्यालय नियमीत वेळेवर उघडणे व बंद करण्यासंदर्भात पोलीसांची मदत घ्यावी, अशा सूचना पत्रकामध्ये दिलेल्या आहेत.

### चर्चेची दारे बंद केली... संघटनांचा आरोप

शिंदे यांच्या सरकारसमोर आम्ही १७ प्रमुख मागण्या सादर केल्या होत्या. सदर मागण्यांबाबत मुख्य सचिव पातळीवर स्वतंत्र चर्चा करुन निर्णय घेतले जातील, असे अधिवचन आम्हाला दिले होते. परंतु सध्याच्या महायुती शासनाच्या १५ महिन्यांच्या कारभारात आमच्या मागण्यांची दखल घेण्यात आलेली नाही. स्वतःला संवेदनशील म्हणवणाऱ्या शासनाने संघटनेला संधी न देता चर्चेची दारे बंद ठेवावीत ही न समजणारी बाब आहे. चर्चा करायची नाही, अशी शासनाने घेतलेली भूमिका कर्मचारी विरोधी आहे, असा उद्वेग कर्मचारी संघटनानी काढलेल्या पत्रकात व्यक्त झाला आहे.



### या आहेत मागण्या



चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहन चालकांची पदभरती सुरु करा. व्यापक आयोग्य विमा योजना सुरु करा, निवृत्तीचे वय ६० वर्षे करा, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा, लिपिकांचे वेतनश्रेणी विषयक प्रश्न सोडवा, आरोग्य विभागातील समस्यांचे निराकरण करा आदी १७ मागण्या कर्मचारी संघटनांच्या आहेत. दोन वर्षात या मागण्यांसाठी संघटनांनी ७ आंदोलने केली आहेत, अशी माहिती राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे भाऊसाहेब पठाण यांनी दिली.

# ‘आयटीएमएस’ प्रकल्प अंतिम टप्यात

## वाहतूक नियोजनाबाबत अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांची माहिती

**महाईन्यूज । पुणे**

**‘पुण्यातील वाहतूक नियोजनासाठी ‘इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम’ (आयटीएमएस) प्रकल्प अंतिम टप्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून पुण्यातील वाहतूक सुरळीत ठेवणे; तसेच बेशिस्तांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे. वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध त्वरित दंडात्मक कारवाई (ई-चलन )करण्यात येणार आहे’, अशी माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी दिली.**




‘सॉफ्टवेअर एक्सपोर्टर्स असोसिएशन ऑफ पुणे’ (सीप) कडून आयोजित करण्यात आलेल्या ‘पुणे सोशल इम्पॅक्ट डायलॉग’ कार्यक्रमात अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील बोलत होते. ‘ग्लोबल सस्टेनिबिलिटी इम्पॅक्ट कोच’ आणि ‘सेवा ब्रिज फाऊंडेशन’चे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण डी. एम., पिनॅकल इंडस्ट्रीजचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. सुधीर मेहता, क्लायमेंट टूपर्स फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नटराजन, सिम्बायोसिसच्या मेडिकल आणि हेल्थ सायन्स विभागाचे कुलसचिव प्रा. राजीव येरवडेकर, ‘सीप’चे अध्यक्ष शिवराज साबळे, उपाध्यक्ष शिवेश विश्वनाथ, माजी अध्यक्षा विनिता गेरा, व्यवस्थापकीय समिती सदस्य बालचंद्र नामजोशी, अवंती कदम या वेळी उपस्थित होते.

मनोज पाटील म्हणाले, ‘पुण्यातील वाहतूक समस्या दिवसेंदिवस जटील होत चालली आहे. पुण्यातील क्षेत्रफळाचा विस्तार झाला आहे. गेल्या २० वर्षांत पुण्यातील क्षेत्रफळात ३३२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. पुण्यात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वापरणाऱ्यांचे प्रमाण ११ टक्क्यांपर्यंत आहे. खासगी वाहनांची संख्या ७९ लाखांपर्यंत पोहोचली आहे.

पुण्यातील वाहतूक व्यवस्था सक्षम, तसेच प्रभावी करण्यासाठी राज्य शासनाने अनेक योजना हाती घेतल्या आहेत. वाहतूक तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली या योजना राबविण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, तसेच ‘आयटीएमएस’च्या माध्यमातून शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यात येणार आहे. या योजनेच्या माध्यमातून बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध ई-चलनाद्वारे त्वरीत दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. शहरातील गर्दीचे ३२ रस्ते निश्चित करून तेथे वाहतूक विषयक कामे सुरू करण्यात आली आहेत.’

‘बेशिस्त वाहनचालकांमुळे वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेण्यात येत आहे. शहरात नव्याने होणारे रस्ते, उड्डाणपुलांची माहिती घेऊन तेथील वाहतूक नियोजनाबाबत कामे करण्यात येत आहे. पुढील पाच वर्षांत पुण्यात मेट्रोसेवेचे जाळे १०२ किलोमीटरपर्यंत तयार होईल. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करणे गरजेचे आहे,’ असे पाटील यांनी नमूद केले. किरण डी. एम., डॉ. सुधीर मेहता, प्रा. राजीव येरवडेकर, विद्याधर पुरंदरे यांनी मनोगत व्यक्त केले. पूजा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालनक केले. शिवेश विश्वनाथ यांनी आभार प्रदर्शन केले.

# हिंजवडी आयटी पार्क परिसरात आठवडाभर वाहतूक कोंडीची शक्यता

**महाईन्यूज । पुणे**

**हिंजवडी आयटी पार्क परिसरात प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी महत्त्वाची वाहतूक सूचना जारी करण्यात आली असून, विप्रो सर्कल ते एमआयडीसी सर्कल (फेज-२) या मार्गावर सध्या वाहतुकीवर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. हिंजवडी ट्रॅफिक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मेट्रो स्टेशन क्रमांक खाली, डोहलर कंपनीसमोरचा रस्ता सध्या एकाच बाजूने खुला ठेवण्यात आला आहे.**






या ठिकाणी महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कंपनीच्या केबलमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी रस्त्याचे उत्खनन सुरू असून, त्यामुळे संपूर्ण मार्गावर केवळ एकाच लेनमधून वाहतूक सुरू आहे. परिणामी, या भागात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता वाढली आहे.

विशेषतः सकाळी ८ ते ११ आणि संध्याकाळी ४ ते ८ या वेळेत मोठ्या प्रमाणावर वाहनांची गर्दी अपेक्षित असल्याने नागरिकांनी शक्य असल्यास पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे. आयटी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी प्रवासाचे नियोजन करून लवकर निघावे किंवा सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, असेही सूचित करण्यात आले आहे.

दरम्यान, केबल दुरुस्तीचे काम वेगाने सुरू असून ते २६ एप्रिल २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तोपर्यंत या मार्गावर वाहतूक मर्यादित स्वरूपातच सुरू राहणार असल्याने नागरिकांनी संयम बाळगून सहकार्य करावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

हिंजवडीसारख्या गजबजलेल्या आयटी हबमध्ये अशा प्रकारच्या कामांमुळे होणाऱ्या वाहतूक बदलांचा मोठा परिणाम दैनंदिन प्रवासावर होतो. त्यामुळे प्रशासनाने वाहतूक नियोजन अधिक प्रभावी करण्याबरोबरच पर्यायी मार्गांबाबत स्पष्ट मार्गदर्शन देणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पिंपरी एसटी आगारात पाणीटंचाई; सहा महिन्यांपासून स्वच्छतागृह बंद

## 200-300 मीटर जाऊन करावा लागतो स्वच्छतागृह वापर, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नाराजी

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड येथील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) आगारातील वर्कशॉपमध्ये गेल्या सहा महिन्यांपासून पाणीटंचाईची गंभीर समस्या असून, स्वच्छतागृह बंद ठेवण्यात आल्याने कर्मचाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहेत. मूलभूत सुविधांच्या अभावामुळे कामकाजावर परिणाम होत असून, प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार कर्मचारी वर्गातून केली जात आहे.**




वल्लभनगर परिसरातील या आगारामध्ये सध्या 50 एस. टी. बस आहेत. दररोज 31 बस फेऱ्या आगारातून सुटतात आणि तेवढ्याच बस परत येतात. याशिवाय दिवसभरात विविध आगारांमधील सुमारे 550 बस येथे ये-जा करतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाहतूक आणि देखभाल कार्य सुरू असताना वर्कशॉपमध्ये आवश्यक पाणीपुरवठा नसल्याने येथे कार्यरत कर्मचाऱ्यांना ऐन उन्हाळ्यात मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. वर्कशॉपमध्ये दररोज बसेसची तपासणी आणि दुरुस्तीची कामे केली जातात. ही कामे वेळेत पूर्ण करणे अत्यावश्यक असते. तपासणी, दुरुस्तीनंतरच बस प्रवाशांच्या सेवेसाठी मार्गस्थ होतात.

मात्र, स्वच्छतागृह बंद असल्याने कर्मचाऱ्यांना सुमारे 200 ते 300 मीटर अंतर चालत जाऊन चालक-वाहकांसाठी असलेल्या विश्रांतीगृहातील स्वच्छतागृहांचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे कामात खंड पडतो आणि वेळेचा अपव्यय होत असल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार वारंवार तक्रारी करूनही आगार प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

> वर्कशॉपमधील स्वच्छतागृह आणि पाण्यासाठी तजवीज करण्यात येत आहे. त्याबाबत कामालादेखील सुरुवात झाली असून, काही दिवसांतच कामे पूर्ण होतील.
> - पल्लवी पाटील, आगारप्रमुख


### त्वरित उपाययोजनांची मागणी

कर्मचारी संघटनांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे. पाणीपुरवठा सुरळीत करून वर्कशॉपमधील स्वच्छतागृह तातडीने सुरू करण्यात यावीत, अशी मागणी होत आहे. दरम्यान, या समस्येमुळे केवळ कर्मचाऱ्यांनाच नव्हे तर अप्रत्यक्षपणे प्रवाशांच्या सेवेलाही फटका बसू शकतो. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने हस्तक्षेप करुन परिस्थिती सुधारावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नगरसेविकेच्या पतीवर हल्ला; जीवे मारण्याची धमकी, सहाजणांवर गुन्हा

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने कारवाईवेळी जप्त केलेला माल संबंधित दुकानदार या पथकाकडून जबरदस्तीने काढून घेत असतानाच मोबाइलमध्ये व्हिडीओ काढल्याने सहा ते सात जणांच्या टोळक्याने नगरसेविकेच्या पतीला मारहाण केली. त्यातील एकाने 'माझे बांगलादेशात शूटर आहेत. त्यांना सांगून तुला मारून टाकू'" अशी धमकी नगरसेविकेच्या पतीला दिली. हा प्रकार पिंपरी कॅम्पमधील उत्तमसिंग वलेचा चौक येथे रविवारी (ता. १९) रात्री आठच्या सुमारास घडला.**



या प्रकरणी धनराज नथ्थूराम आसवानी (रा. पिंपळे सौदागर) यांनी पिंपरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, त्यांच्या पत्नी सविता आसवानी या महापालिकेत नगरसेविका आहेत. या प्रकरणात पोलिसांनी फय्याज शेख, आरिफ शेख, मुल्लाजी, अरबाज, शोहेब, उमर या नावाच्या व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे. रविवारी महापालिकेचे पथक उत्तमसिंग वलेचा चौकाजवळील महापालिका वाहनतळाच्या समोरील मुनाफ कलेक्शन या कपड्याच्या दुकानाजवळ आले. तेथील पदपथावरील फेरीवाल्यांवर कारवाई करीत असताना मुनाफ कलेक्शन या दुकानाचा मालक फय्याज शेख व त्याच्या कर्मचारी महापालिकेच्या पथकाने कारवाई करून जप्त केलेला माल व इतर साहित्य त्यांच्याकडून जबरदस्तीने काढून घेत होते. त्यावेळी याबाबतचा व्हिडिओ फिर्यादी मोबाइलमध्ये काढत असताना फय्याज शेख यांच्यासह इतर आरोपींनी फिर्यादीला मारहाण व धक्काबुक्की केली. फय्याज शेख याने जिवे मारण्याची धमकी फिर्यादीला दिली.

### कारवाईच्या मागणीसाठी पिंपरी कॅम्प बंद

या आरोपींवर गुन्हा दाखल करून कडक कारवाई करावी, या मागणीसाठी फिर्यादी यांच्यासह पिंपरी कॅम्पमधील मोठ्या दुकानदार व्यापाऱ्यांनी रविवारी (ता. १९) सायंकाळी दुकाने बंद ठेवून पिंपरी पोलिस ठाण्यासमोर ठिय्या मांडला. तसेच रात्री शगून चौकात 'रास्ता रोको' केला. अखेर सोमवारी (ता. २०) पहाटे या प्रकरणी गुन्हा दाखल झाला.

### धमकी आणि हल्ला प्रकरण

कर्मचारी संघटनांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे. पाणीपुरवठा सुरळीत करून वर्कशॉपमधील स्वच्छतागृह तातडीने सुरू करण्यात यावीत, अशी मागणी होत आहे. दरम्यान, या समस्येमुळे केवळ कर्मचाऱ्यांनाच नव्हे तर अप्रत्यक्षपणे प्रवाशांच्या सेवेलाही फटका बसू शकतो. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने हस्तक्षेप करुन परिस्थिती सुधारावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## भूमिका

**महिला सक्षमीकरणाच्या नावाखाली महिला आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असला, तरी त्यामागील राजकीय हेतूंचा वेध घेणे आवश्यक ठरते. २०२३ साली महिला आरक्षण विधेयक संसदेत मंजूर झाले, त्यावेळी सर्वपक्षीय सहमतीने हा ऐतिहासिक निर्णय झाला होता. स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनगणनेनंतर या कायद्याची अंमलबजावणी होईल, असे स्पष्ट केले होते.**

# 'भ्रूण'हत्येची भलामण



मात्र, तीन वर्षे उलटूनही त्या निर्णयाची अधिसूचना निघाली नाही, ही वस्तुस्थिती दुर्लक्षित करता येणार नाही. अशा परिस्थितीत पुन्हा विशेष अधिवेशन बोलावून महिला आरक्षणाचा मुद्दा पुढे आणण्यामागील उद्देश काय, हा प्रश्न उपस्थित होतो. जर सरकारचा हेतू खरोखरच महिला सक्षमीकरणाचा असता, तर आधीच्या निर्णयाची अंमलबजावणी केली गेली असती. परंतु तसे न होता नव्याने 'नारीशक्ती वंदन'चा गाजावाजा करण्यात आला. यातून सरकारच्या प्रामाणिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

या अधिवेशनादरम्यान काँग्रेसचे नेते मनीष तिवारी यांनी अधिसूचना न निघाल्याचा मुद्दा उपस्थित केला आणि त्यानंतरच सरकारने घाईघाईने ती प्रक्रिया पूर्ण केली. यावरून सरकारची तयारी आणि गांभीर्य यावर शंका निर्माण होते. जर विरोधकांनी हा मुद्दा उपस्थित केला नसता, तर अंमलबजावणी न झालेल्या कायद्यात दुरुस्ती करण्याचा प्रयत्न झाला असता, ही बाब अधिक चिंताजनक ठरते.

महिला आरक्षणासोबत मतदारसंघ पुनर्रचनेचा मुद्दा जोडण्याचा निर्णयही संशयास्पद वाटतो. स्वतंत्रपणे महिला आरक्षण लागू करता आले असते, मात्र त्याला इतर राजकीय गणितांशी जोडल्याने या निर्णयामागील हेतू अधिकच अस्पष्ट होतो. विरोधकांनी या मुद्द्यावर एकजूट दाखवत सरकारचा हा डाव ओळखला, हे लोकशाहीसाठी सकारात्मक लक्षण मानावे लागेल.

सरकारकडून विरोधकांवर 'महिलाविरोधी' असल्याचा आरोप केला जात असला, तरी वस्तुस्थिती वेगळी आहे. महिला आरक्षणाला विरोध नव्हता, तर त्याच्या अंमलबजावणीच्या पद्धतीवर आक्षेप होता. कोणताही महत्त्वाचा निर्णय घेताना पारदर्शकता आणि प्रामाणिकता अपेक्षित असते. या प्रकरणात ती कमी पडल्याचे दिसते. महिला सक्षमीकरण हा केवळ राजकीय घोषणांचा विषय नसून, तो प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध होणे आवश्यक आहे. केवळ अधिवेशन, घोषणाबाजी किंवा प्रतिमा उभारणी यावर न थांबता ठोस अंमलबजावणी गरजेची आहे. अन्यथा, महिला आरक्षणासारखा महत्त्वाचा विषयही राजकीय खेळीचा भाग ठरेल.

शेवटी, महिला आरक्षणाचा मुद्दा हा राजकारणाच्या पलीकडे जाऊन विचार करण्याचा आहे. सरकार आणि विरोधकांनी परस्पर संवादातून यावर तोडगा काढणे गरजेचे आहे. लोकशाहीत मतभेद असू शकतात, पण त्यातूनच योग्य निर्णय घ्यावा लागतो. महिला सक्षमीकरणाचा खरा हेतू साध्य करायचा असेल, तर राजकीय स्वार्थ बाजूला ठेवून प्रामाणिक प्रयत्न करणे हाच एकमेव मार्ग आहे.

## प्रासंगिक »

### व्यंग

**चेष्टा कसलीही करावी. पण, ती केवळ गंमत किंवा मस्करी म्हणूनच. एखाद्याच्या व्यंगावर चेष्टा करणे अथवा त्या व्यंगाचा उल्लेख करून चारचौघांत त्याचा अपमान करणे हे गैरच.**

ते सभ्यतेचे लक्षण नव्हे, पण एखाद्याने असे केलेच तर ती चेष्टा आपल्यावर उलटूही शकते, याचे भान ठेवावे. आपला पांडुरंग एकदा रस्त्यावरून ऐटीत चालला होता, तेवढ्यात समोरून किरण येताना दिसली.

ती थोडीशी तिरळी होती. पांडुरंगचा स्वभाव मुळातच खवचट, त्यात तिरळे बघणारी किरण समोरून आलेली. पांडुरंग म्हणाला, "काय किरण! कसं काय ठीक आहे ना? कुठं चाललीस? आणि तुला म्हणे एका वस्तूच्या दोन वस्तू दिसतात.

खरं का?" किरणच्या लक्षात आले की, हा आपली चेष्टा करतोय, आपणाला हिणवतोय. म्हणून ती म्हणाली, "खरं आहे हे ! आता हेच बघ ना, तुला दोन पाय आहेत ना? पण मला तुला चार पाय असल्याचं दिसत आहे !"

- तात्पर्य : दुसऱ्याच्या व्यंगाला हसू नये. त्याचा उपहास करू नये.

**लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा मुद्दा सध्या देशातील सर्वात चर्चेचा विषय ठरला आहे. २०२३ मध्ये हे विधेयक संमत झाले आणि अलीकडे त्याची अधिसूचनाही जारी करण्यात आली. मात्र, त्यात दुरुस्ती करण्याचा प्रयत्न अपयशी ठरल्याने आता पुढे काय होणार, हा प्रश्न निर्माण झाला आहे.**

# उपकार नव्हेत, हा महिलांचा हक्क आहे!



सरकार २०२९ पर्यंत अंमलबजावणीची भूमिका मांडत असताना, मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडल्याने या प्रक्रियेला अडथळे निर्माण झाले आहेत.

भारतातील महिलांची राजकारणातील भागीदारी पाहिली, तर ती अत्यंत संथ गतीने वाढलेली दिसते. लोकसभेच्या पहिल्या निवडणुकीत महिलांचे प्रतिनिधित्व केवळ ४.४ टक्के होते, तर आजही ते सुमारे १४ टक्क्यांच्या आसपासच आहे. जागतिक सरासरी २० टक्क्यांपेक्षा अधिक असताना, भारतासारख्या मोठ्या लोकशाहीत हा आकडा कमीच मानावा लागेल. यावरून महिलांना राजकारणात संधी मिळण्यात अजूनही अनेक अडथळे असल्याचे स्पष्ट होते.

महिला आरक्षणाचा विचार नवीन नाही. पंचायती राज व्यवस्थेत ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतल्यानंतर, संसद आणि विधानसभांमध्येही तो लागू करण्याची मागणी सातत्याने होत आली आहे. अनेक सरकारांनी प्रयत्न केले, पण राजकीय मतभेद आणि सत्तासमीकरणांमुळे हे विधेयक वारंवार रखडले. अखेर २०२३ मध्ये ते संमत झाले, ही सकारात्मक बाब असली तरी त्याची अंमलबजावणी पुढे ढकलली जाणे चिंताजनक आहे.

आज प्रश्न असा आहे की, जे सर्व पक्ष महिलांना आरक्षण देण्याची भाषा करतात, तेच पक्ष उमेदवारी देताना मागे का पडतात? महिलांना संधी दिल्यास त्या निवडून येणार नाहीत, हा युक्तिवाद अजूनही पुढे केला जातो. हीच पुरुषप्रधान मानसिकता महिला सक्षमीकरणाच्या मार्गातील सर्वात मोठी अडचण आहे.

महिला आरक्षण हा केवळ राजकीय मुद्दा नसून सामाजिक परिवर्तनाचा भाग आहे. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढल्यास धोरणे अधिक समावेशक होतील. त्यामुळे या विषयावर राजकारण न करता ठोस आणि वेळेत अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. महिलांना समान संधी देण्याची वेळ आता निघून चालली आहे. आणखी विलंब न करता महिला आरक्षणाचा निर्णय प्रत्यक्षात उतरवणे, हेच खरे लोकशाहीचे लक्षण ठरेल.

## ।। अभंगवाणी ।।



संतांच्या धीक्कारें अमंगळ जिणें ।
विश्वशत्रु तेणें सांडी परि ॥१॥

कुळ आणि रूप वांयां संवसार ।
गेला भरतारी मोकलितां ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राळेगावात मानवी तस्करीच्या आरोपावरून हिंसाचार

## यवतमाळच्या राळेगावात ३४ मुलींच्या मानवी तस्करीच्या दाव्याने खळबळ

**महाईन्यूज | यवतमाळ**

**जिल्ह्यातील राळेगाव तालुक्यातून गेल्या सहा महिन्यात तब्बल ३४ आदिवासी मुली बेपत्ता झाल्या आणि त्याचा थेट संबंध मानवी तस्करी किंवा 'लव्ह जिहाद'शी असल्याचा खळबळजनक आरोप भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चौहाण यांनी केला. त्यानंतर गृह व पोलीस विभागाने सर्वत्र कसून चौकशी केली, मात्र कुठेही बेपत्ता किंवा अपहरण झालेल्या मुलींची संख्या भाजपने जाहीर केलेल्या संख्येशी जुळली नाही. भाजपने आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांची कोंडी करण्यासाठी हे प्रकरण उभे केल्याची चर्चा आता भाजपच्याच अंतर्गत वर्तुळात सुरू आहे.**



### पोलिसांच्या संख्येशी भाजपचा मेळ जुळेना

भाजपने हवा केलेल्या या प्रकरणाला अनेक कांगोरे असल्याची चर्चा सुरू आहे. पोलिसांनी राळेगाव मतदारसंघातून गेल्या तीन वर्षात बेपत्ता, अपहरण झालेल्या तक्रारी व गुन्ह्यांची संख्या जाहीर केली. २०२३ मध्ये एकूण २२ गुन्हे दाखल झाले, या सर्व प्रकरणातील मुली सापडल्या. २०२४ मध्ये २५ गुन्हे दाखल असून, २५ गुन्हे उघडकीस आले. २०२५ मध्ये २७ गुन्हे दाखल झाले तर २६ गुन्ह्यांचा छडा लागला. २०२६ मध्ये गेल्या चार महिन्यांत १२ गुन्हे दाखल झाले आठ गुन्हे उघडकीस आले. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनीही पोलिसांककडे राळेगाव तालुक्यातून बेपत्ता ३४ मुलींच्या संदर्भात एकही तक्रार दाखल नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे भाजपने मतदारसंघातून ३४ आदिवासी मुली बेपत्ता झाल्याचा आरोपच निराधार असल्याची चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरू आहे.

मानवी तस्करीसंदर्भात संशय निर्माण करणारी एक 'ऑडिओ क्लिप' सार्वत्रिक झाली आहे. भाजपचे जिल्हाध्यक्ष आणि कार्यकर्त्यांनी या प्रकरणाला लव्ह जिहादशी जोडल्याने राळेगाव येथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आज सोमवारी या घटनेच्या निषेधार्त विविध सामाजिक संघटना आणि व्यापारी संघटनांनी पुकारलेल्या राळेगाव बंदला हिंसक वळण लागले. कार्यकर्त्यांनी संशयित आरोपीवर कठोर कारवाईची मागणी करत बसस्थानक चौकात टायर जाळले. तर रविवारी रात्री जमावाने या प्रकरणाचा मुख्य संशयित मजहर कुरेशी याच्या घरावर दगडफेक केली. यावेळी जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. शिवाय कुरेशी याच्या मालकीचे अतिक्रमित जागेवरील एक दुकान प्रशासनाने बुलडोजरने तोडले.

कुरेशी याच्यावर पोलिसांनी आधीच प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. परंतु, तरीही भाजपकडून हे प्रकरण तापवण्याचा प्रयत्न होत असल्याची राळेगावात चर्चा आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी राळेगाव येथे भाजप जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चौहाण यांच्यासह भेट देवून नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले. पोलीस चौकशी करत असून, लवकरच प्रकरणाचा संपूर्ण छडा लागेल, असे मंत्री उईके यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# सातारा-पुणे महामार्गावर 'हॉटेल अन्नानंद'चा दिमाखदार शुभारंभ

**महाईन्यूज | सातारा**

**"आजच्या काळात तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता स्वतःचा व्यवसाय सुरू करून स्वावलंबी व्हावे आणि इतरांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात," हा मोलाचा संदेश देत सातारा-पुणे महामार्गावरील लिंब येथे 'हॉटेल अन्नानंद' या भव्य प्रकल्पाचा शानदार शुभारंभ सोमवारी पार पडला.**






कोल्हापूरच्या कणेरी मठाचे प. पूज्य श्री समर्थ सद्गुरू अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी महाराज आणि राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.

या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी तरुणांच्या या धाडसी पाऊलाचे कौतुक केले. कणेरी मठाधिपती काडसिद्धेश्वर स्वामीजींनी हॉटेल व्यवसायाला आशीर्वाद दिले, तर नामदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी या उपक्रमामुळे स्थानिक रोजगाराला चालना मिळणार असल्याचे प्रतिपादन केले. याप्रसंगी कुडाळ पंचायत समितीचे सभापती श्री. सौरभ बाबा शिंदे यांचीही उपस्थिती लक्षणीय होती.

> "व्यवसाय करून स्वावलंबी होण्याचा आमचा हा छोटासा प्रयत्न आहे. या मंगलप्रसंगी मिळालेला मान्यवरांचा आशीर्वाद आणि स्नेह्यांची उपस्थिती आम्हाला भविष्यात नक्कीच बळ देईल.
> - सोमनाथ कदम

### हायवेवरील प्रवाशांसाठी पर्वणी

सातारा-पुणे हायवे लगत, लिंब येथील इंडियन ऑईल पेट्रोल पंपा शेजारी हे हॉटेल वसलेले आहे. महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी आणि सातारा जिल्ह्यातील खवय्यांसाठी हे एक उत्तम खाद्यसंस्कृतीचे केंद्र ठरणार आहे. या ठिकाणी सर्व सोयीसुविधांनी युक्त आणि स्वच्छ वातावरणात दर्जेदार जेवण उपलब्ध करून देण्यात आले आहे.

### तरुणाईचा नवा आदर्श

स्पर्धात्मक युगात सरकारी किंवा खासगी नोकरीवर अवलंबून न राहता सोमनाथ कदम, राजू सावंत, मयूर मोहिते आणि श्रेयश कदम या चार तरुण उद्योजकांनी एकत्र येत हॉटेल व्यवसायात पदार्पण केले आहे. 'अन्नानंद'च्या माध्यमातून केवळ चवदार जेवणच नव्हे, तर परिसरातील तरुणांना काम देण्याचा संकल्प या युवकांनी सोडला आहे, जो आजच्या पिढीसाठी एक नवा आदर्श ठरत आहे.

# जपानमध्ये ७.४ तीव्रतेचा भूकंप

## त्सुनामीचा इशारा, १० फूट उंच लाटांचा धोका; हवामान विभागाचा इशारा

महाईन्यूज । जपान

**उत्तर जपानमध्ये सोमवारी भूकंपाचे धक्के जाणवले. या भागात ७.४ रिश्टर स्केलचा हादरा जाणवल्याची माहिती समोर आली आहे. जपानच्या हवामान विभागाने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, या भूकंपानंतर त्सुनामीचा इशारा देण्यात आला असून, तीन मीटर उंच (१० फूट) लाटांची शक्यता वर्तवली आहे.**



समोर आलेल्या माहितीनुसार, भूकंपाचा धक्का एवढा तीव्र होता की, टोकियोमध्ये अनेक इमारतींना हादरा बसला असून, कत्येक किलोमीटर लांब याचा प्रभाव दिसून आला. भूकंपाचे हादरे जाणवल्यानंतर सुमारे ४० मिनिटांनी ८० सेंटीमीटर (३१ इंच) उंच लाटा इवाटे येथील कुजी बंदराला धडकल्या, अशी माहिती जपान हवामान विभागाने माहिती प्रसिद्ध केली आहे. यानंतर प्रशासनाने किनाऱ्या जवळील नागरिकांना या ठिकाणावरुन लांब जाण्याचे आवाहन केले आहे.

किनारी भागातील नागरिक आणि नदीजवळील नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. जमिनीवरुन उंच असणाऱ्या आणि बचावकार्य करण्यास सोपे असणाऱ्या ठिकाणी नागरिकांना आश्रय घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. त्सुनामीच्या उंच लाटांमुळे नुकसानाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात आली आहे. त्सुनामीचा धोका लक्षात घेता नागरिकांनी पुढील सूचना मिळेपर्यंत सुरक्षित ठिकाणे सोडू नयेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

### त्सुनामीची भीती

दरम्यान, आत्ताच्या त्सुनामीच्या फटक्यांमुळे झालेल्या नुकसानीची माहिती अद्याप समोर आलेली नाही. पण, त्सुनामीचा जोर वाढण्याची भीती हवामान खात्याने वर्तवली आहे. प्रशासनाने बचाव पथकांना सज्ज राहण्याची सूचना देण्यात आली आहे. ज्या भागात अधिक नुकसान होण्याची भीती आहे? अशा ठिकाणच्या नागरिकांना सतर्क राहण्यास प्रशासनाने बजावले आहे. भूकंप प्रवण भाग असल्याने जपानमध्ये दरवर्षी मोठ्या संख्येने भूकंपाचे धक्के जाणवतात.

### २०११ सालची त्सुनामी

२०११ साली जपानमध्ये ९.० रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता यामुळे निर्माण झालेल्या त्सुनामीच्या लाटांमध्ये १८,५०० नागरिकांचा मृत्यू झाला होता. याशिवाय फुकूशिमा आण्विक केंद्राजवळ मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. दरम्यान, आत्ता जाणवलेल्या भूकंपाच्या धकक्यांमुळे नागरिकांना सतर्क राहण्याची सूचना करण्यात आली असून, पुढील सूचना मिळेपर्यंत नागरिकांना सुरक्षित ठिकाण न सोडण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# उधमपूर बस अपघात: दरीत कोसळून १६ जणांचा मृत्यू

महाईन्यूज । जम्मू-काश्मीर

**जम्मू-काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यात सोमवारी सकाळी एक अत्यंत हृदयद्रावक घटना घडली. प्रवाशांनी भरलेली एक बस नियंत्रणाबाहेर जाऊन खोल दरीत कोसळल्याने किमान १६ जणांचा मृत्यू झाला आहे. या भीषण अपघातात अनेक जण गंभीर जखमी झाले असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्रशासनाकडून तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले असून जखमींना रुग्णालयात हलवण्यात येत आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात सकाळी १० वाजेच्या सुमारास घडला. सदर बस रामनगरहून उधमपूरच्या दिशेने जात होती. प्रवासादरम्यान एका धोकादायक वळणावर चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले. बस रस्त्यावरून घसरून आधी पलटी झाली आणि त्यानंतर थेट डोंगरदरीत कोसळली. स्थानिक नागरिक आणि बचाव पथकांनी घटनास्थळी धाव घेत ढिगाऱ्याखाली अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्याचे काम सुरू केले आहे.

या भीषण दुर्घटनेवर राष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यामध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू – "उधमपूरमधील बस अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल ऐकून मला अत्यंत दुःख झाले आहे. मृतांच्या कुटुंबियांच्या प्रति मी संवेदना व्यक्त करते आणि जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी प्रार्थना करते," असे त्यांनी 'X' (ट्विटर) वर म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी "जम्मू-काश्मीरमधील ही दुर्घटना क्लेशदायक आहे. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे, त्यांच्या दुःखात मी सहभागी आहे," अशा शब्दांत पंतप्रधानांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

### मदत आणि बचाव कार्य

अपघाताची भीषणता पाहता मृतांची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. स्थानिक रुग्णालयांमध्ये आणीबाणी घोषित करण्यात आली असून डॉक्टरांचे पथक जखमींवर उपचार करत आहे. माजी मुख्यमंत्री महबूबा मुफ्ती यांनीही या अपघातावर दुःख व्यक्त करत शोकाकुल कुटुंबियांना धीर दिला आहे. डोंगाळ भागात होणारे हे वारंवार अपघात प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणत आहेत. सध्या सर्व यंत्रणांचे लक्ष जास्तीत जास्त प्राण वाचवण्यावर केंद्रित आहे.

### प्रशासकीय यंत्रणा सतर्क

जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी या घटनेबद्दल "गहन शोक" व्यक्त केला असून पीडित कुटुंबांना सरकार सर्वतोपरी मदत करेल, असे आश्वासन दिले आहे. तसेच, नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी जिल्हा प्रशासन, पोलीस, SDRF आणि आरोग्य विभागाला तातडीने मदत कार्य करण्याचे निर्देश दिले आहेत.केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, गंभीर जखमींना उपचारासाठी विमानाने (AIRLIFT) हलवण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. ते सातत्याने स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात असून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

# अवनीतची प्लास्टिक सर्जरी?



चित्रपटसृष्टीत अभिनेत्रींचे सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी प्लास्टिक सर्जरी हा ट्रेंड आहे. प्रियंका चोप्रा, शिल्पा शेट्टी, जान्हवी कपूर आणि अनुष्का शर्मासारख्या अभिनेत्रींनी नाक, ओठ किंवा चेहऱ्याच्या रचनेत बदल करण्यासाठी शस्त्रक्रियेचा आधार घेतल्याचे सांगितले जाते. अशातच अभिनेत्री



अवनीत कौरनेदेखील प्लास्टिक सर्जरी केल्याची चर्चा रंगली. अवनीत मुलाखतीत बोलताना म्हणाली, “मी अशा कमेंट्सकडे लक्ष देत नाही. पण लोकांना असे वाटत असेल तर त्यांनी माझ्या लहानपणीच्या आणि आताच्या फोटोची तुलना करावी. वयानुसार चेहऱ्यात बदल होणे ही पूर्णपणे नैसर्गिक प्रक्रिया आहे. प्रत्येक व्यक्ती वय वाढत असताना बदलते आणि ते अगदी सामान्य आहे”, असे स्पष्ट केले. अवनीतने सांगितले की, नाक, डोळे आणि वैशिष्ट्ये आजही पूर्वीसारखीच आहेत. तिच्या चेहऱ्यावरील तीळाचा संदर्भ देत ती म्हणाली, “माझा हा तीळ आजही तिथेच आहे, जिथे तो आधी होता. माझ्या सौंदर्याचं संपूर्ण श्रेय मी माझ्या आईला देते. मला जे काही मिळालं आहे, ते नैसर्गिकरित्या मिळालं आहे”. वर्कफ्रंटबाबत बोलायचे तर, अवनीत कौर नुकतीच शांतनु माहेश्वरीसोबत ‘लव्ह इन व्हिएतनाम’ या चित्रपटात झळकली होती.



# ‘मम्मा’ म्हणताच पापाराझींवर भडकली श्रुती हासन!



बॉलिवूड आणि साऊथ इंडस्ट्रीत आपल्या बिनधास्त स्वभावासाठी ओळखली जाणारी श्रुती हासन सध्या एका व्हायरल व्हिडिओमुळे चर्चेत आली आहे. मुंबईत एका रेस्टॉरंटबाहेर घडलेल्या घटनेत ती पापाराझींवर संतापलेली दिसली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, चाहत्यांमध्ये याबाबत वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, श्रुती हासन नुकतीच मुंबईतील एका रेस्टॉरंटमध्ये गेली होती. ती बाहेर येताच पापाराझींनी तिला फोटोसाठी घेरले. याच वेळी एका फोटोग्राफरने तिला “मम्मा” असे संबोधले. हे ऐकताच श्रुतीला राग अनावर झाला. तिने ताबडतोब प्रतिक्रिया देत विचारले, “काय बडबड करता? कोण आहे मम्मा? तुमची मम्मा आहे का?” अशा शब्दांत तिने आपला संताप व्यक्त केला. विशेष म्हणजे, ही घटना थोड्या गैरसमजामुळे घडल्याचे सांगितले जात आहे. प्रत्यक्षात पापाराझींनी “मम्मा” नव्हे तर “अम्मा” असा शब्द वापरला होता. दक्षिण भारतात “अम्मा” हा शब्द महिलांना आदराने किंवा प्रेमाने संबोधण्यासाठी वापरला जातो. मात्र, श्रुतीला तो “मम्मा” असा ऐकू गेला आणि त्यामुळे ती चिडली. या घटनेनंतर श्रुतीने लगेच आपली कार तपासली आणि त्यात बसून निघून गेली. हा संपूर्ण प्रकार कॅमेऱ्यात कैद झाला आणि काही वेळातच सोशल मीडियावर व्हायरल झाला. अनेक युजर्सनी या व्हिडिओवर प्रतिक्रिया दिल्या आहेत. काहींनी श्रुतीच्या प्रतिक्रियेला समर्थन दिले, तर काहींनी हा फक्त गैरसमज असल्याचे म्हटले. साधारणपणे श्रुती हासन शांत आणि संयमी स्वभावाची दिसते. पापाराझींशीही ती नेहमी सौम्य वागते. त्यामुळे या वेळी तिचा असा संताप पाहून अनेकांना आश्चर्य वाटले. पण काही चाहत्यांनी तिच्या बाजूने बोलत, “कोणालाही अशा प्रकारे संबोधणे योग्य नाही,” असे मत व्यक्त केले. कामाबद्दल बोलायचे झाल्यास, श्रुती हासन सध्या अनेक प्रोजेक्ट्समध्ये व्यस्त आहे. ती लवकरच ‘आकाशमलो ओका तारा’ या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात तिच्यासोबत दुलकर सलमान आणि सात्विका वीरावल्ली प्रमुख भूमिकेत आहेत. याशिवाय ती ‘सालार पार्ट २’ मध्येही झळकणार आहे, ज्यात प्रभास आणि पृथ्वीराज सुकुमारन यांच्यासोबत ती स्क्रीन शेअर करणार आहे.

# दीपिका कुमारी, आरव यांना सुवर्ण

## वरिष्ठ महिलांच्या वैयक्तिक रिकर्व्ह प्रकारात दीपिका कुमारी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**राष्ट्रीय मानांकन तिरंदाजी स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी दमदार कामगिरी करत देशाचा मान उंचावला आहे. विशेषतः दीपिका कुमारी आणि आरव पुनिया यांनी सुवर्णपदके पटकावत आपली श्रेष्ठता सिद्ध केली. वरिष्ठ महिलांच्या वैयक्तिक रिकर्व्ह प्रकारात दीपिका कुमारीने अत्यंत आत्मविश्वासपूर्ण खेळ करत अंकिता भक्त हिचा 7-1 असा पराभव केला. तिच्या अचूक लक्ष्यभेद आणि शांत स्वभावामुळे हा विजय एकतर्फी ठरला.**



अंकिता भक्तला मात्र रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

दुसरीकडे, वरिष्ठ पुरुषांच्या विभागात आरव पुनियानेही उल्लेखनीय कामगिरी करत सुखचेन सिंग याचा 7-3 असा पराभव करून सुवर्णपदक मिळवले. आरवचा खेळ सुरुवातीपासून आक्रमक आणि संतुलित दिसून आला, ज्यामुळे त्याने सामना आपल्या बाजूने झुकवला. सुखचेन सिंगनेही चांगला प्रतिकार केला, परंतु शेवटी त्याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.


या स्पर्धेतील दीपिका आणि आरव यांची कामगिरी आगामी आशियाई स्पर्धा तसेच आंतरराष्ट्रीय पात्रता फेऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. त्यांच्या या यशामुळे भारतीय तिरंदाजीला नवसंजीवनी मिळाली असून, भविष्यातील मोठ्या स्पर्धांसाठी आशा अधिक बळकट झाल्या आहेत.




# श्रेयस अय्यरकडून युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीवर कौतुकाचा वर्षाव

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इंडियन प्रीमियर लीग (IPL 2026) च्या चालू हंगामात आपल्या स्फोटक फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या राजस्थान रॉयल्सच्या वैभव सूर्यवंशी या युवा खेळाडूवर पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यरने स्तुतिसुमने उधळली आहेत. वैभव हा एक विलक्षण प्रतिभावान खेळाडू असून तो भारतीय क्रिकेटचे भविष्य असल्याचे मत श्रेयस अय्यरने व्यक्त केले आहे.**





आयपीएल २०२६ च्या हंगामात वैभव सूर्यवंशी एका नव्या अवतारात समोर आला आहे. त्याने आतापर्यंत खेळलेल्या सहा डावांत २३६ पेक्षा अधिकच्या विस्मयकारक स्ट्राईक रेटने २४६ धावा कुटल्या आहेत. सलामीला येत निर्भयपणे खेळण्याच्या त्याच्या शैलीने क्रिकेट विश्वात मोठी खळबळ माजवली आहे. वैभवच्या या कामगिरीबद्दल बोलताना श्रेयस अय्यर म्हणाला, "वैभव ही एक देदीप्यमान प्रतिभा आहे. त्याच्या कौतुकासाठी शब्दही अपुरे पडतील. चेंडू पडण्यापूर्वीच त्याची बॅट ज्या प्रवाहाने फिरते आणि तो जी लय प्राप्त करतो, ते पाहता तो निश्चितच भविष्यातील मोठा खेळाडू आहे."'

श्रेयस अय्यरने स्वतः देखील या हंगामात २०८ धावा फटकावून आपला फॉर्म सिद्ध केला आहे. आधुनिक टी-२० क्रिकेटमध्ये स्वावलंबन आणि स्वतःच्या नैसर्गिक शैलीवर विश्वास ठेवणे किती महत्त्वाचे आहे, हे त्याने यावेळी अधोरेखित केले. वैभव सूर्यवंशीचा खेळ याच विचारसरणीशी सुसंगत असल्याचे श्रेयसने नमूद केले.

तो पुढे म्हणाला, "मी जेव्हा इतर खेळाडूंशी संवाद साधतो, तेव्हा त्यांना एकच संदेश देतो तुम्ही जसे आहात तसेच राहा. कोणाचेही अनुकरण करण्याचा प्रयत्न करू नका. जेव्हा तुम्ही तुमच्या स्वतःच्या शैलीत निर्भय आणि आक्रमक असता, तेव्हा तुम्हाला कोणाचीही नक्कल करण्याची गरज उरत नाही." पंजाब किंग्सच्या यशात सलामीवीर प्रभसिमरन सिंग आणि प्रियांश आर्य यांनी बजावलेल्या कामगिरीचे श्रेयही त्याने याच मानसिकतेला दिले.

पंजाब किंग्सला पहिल्या विजेतेपदापर्यंत नेण्यासाठी श्रेयस अय्यर प्रयत्नशील असला, तरी त्याने वैभव सूर्यवंशीबद्दल व्यक्त केलेले कुतूहल आयपीएलमधील एका मोठ्या बदलाचे निदर्शक आहे. तरुण आणि धाडसी फलंदाज आता खेळाचा वेग आणि परिभाषा बदलत असल्याचे यातून स्पष्ट होत आहे.

### दडपणाखालील वावर आणि बुमराहचा सामना

आपल्या फलंदाजीचा अनुभव सांगताना श्रेयसने जसप्रीत बुमराहविरुद्धच्या एका थरारक प्रसंगाची आठवण जागवली. तो म्हणाला, "जगातील सर्वोत्तम गोलंदाजाचा सामना करताना तुम्हाला तुमच्या उपजत कौशल्यावर विश्वास ठेवावा लागतो. उच्च दडपणाच्या स्थितीत विचारांची स्पष्टता आणि भावनांवर नियंत्रण असणे अत्यंत आवश्यक आहे."

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार ।
दि. 21एप्रिल 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## महिला लोकप्रतिनिधींचा काळ्या साड्यांत निषेध; काँग्रेसवर तीव्र टीका

# ‘नारीशक्ती वंदन’ विधेयक नामंजूर; निषेधार्थ महापालिका सभा तहकूब

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**नारीशक्ती वंदन अधियनिम' हे विधेयक लोकसभेत नामंजूर झाल्याच्या निषेधार्थ सोमवारी (ता. २०) पिंपरी-चिंचवड महापालिकेची सर्वसाधारण सभा तहकूब करण्यात आली. लोकप्रतिनिधी महिलांनी काळ्या रंगाच्या साड्या परिधान करुन नारीशक्ती विधेयक नामंजूर झाल्याचा निषेध नोंदवला. सभेचे कामकाज सुरु झाल्यानंतर विरोधी पक्षनेते भाभसाहेब भोईर यांनी ख्यातनाम ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिली.**



त्यानंतर, महिला लोकप्रतिनिधींनी आपल्या मनोगतातून नारीशक्ती विधेयक नामंजूर केल्याच्या निषेधार्थ कॉंग्रेसचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला व सभा तहकूब करण्याची विनंती केली. त्यानुसार, सभा ५ मेपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. नगरसेविका योगिता नागरगोजे म्हणाल्या, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे स्त्रीसन्मानाचे विधेयक संसदेत मांडले ही सर्व महिलांसाठी स्वाभामिनाची गोष्ट होती. पण, विरोधकांनी हे विधेयक फेटाळून स्त्रीशक्तीचा अपमान केला आहे. कॉंग्रेसला स्त्री शक्तीचा विसर पडला आहे." नगरसेविका शकुंतला धराडे म्हणाल्या, "महिला घराबरोबरच देशही सांभाळू शकतात हे ओळखून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नारीशक्ती विधेयक मांडले होते. मात्र, या अतिशय महत्त्वाच्या विधेयकाच्या विरोधात मतदान करुन कॉंग्रेसने देशभरातील महिलांचा आनंद हिरावून घेतला आहे. हे विधेयक नामंजूर करणे म्हणजे फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेचा आणि सावित्रीबाई फुले यांचा अवमान आहे."

"आपल्या देशात महिला प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत. ऑपरेशन सिंदूर या मोहिमेचे नेतृत्व महिलने केले होते. नारीशक्ती विधेयक फेटाळून विरोधकांनी मूर्खपणा केला आहे. विरोधकांचा निषेध आम्ही करत आहोत." भावना नगरसेविका अर्चना तापकीर यांनी व्यक्त केली. "नारीशक्ती विधेयक नामंजूर होणे हा नारीशक्तीवरील आघात आहे. कॉंग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी या महिला असून त्यांनी या विधेयकाला विरोध केला याचे नवल वाटते. कॉंग्रेसने केलेला हा अपमान महिला सहन करणार नाहीत." असे नगरसेविका रीटा सानप म्हणाल्या.

नगरसेविका अनुराधा गोरखे म्हणाल्या, "महिलांना घाबरुन कॉंग्रेसने नारीशक्ती विधेयक फेटाळले आहे. नारीशक्ती विधेयक म्हणजे देशभरातील महिलांना पुढे जाण्याची, नेतृत्व करण्याची संधी होती. विधेयक फेटाळणाऱ्या कॉंग्रेसचा निधेष आहे." "ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी देशाच्या राजकारणात महिलांना ३३ टक्के आरक्षण दिले. बदल घडवण्यासाठी स्त्री शक्तीचे महत्व ओळखून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नारीशक्ती वंदन विधेयक आणले होते, तेव्हाच आनंद झाला होता. मात्र, कॉंग्रेसने देशभारतील महिलांचा आनंद हिरावून घेतला आहे. सभागृहातील आम्ही सर्व महिला लोकप्रतिनिधी कॉंग्रेसचा निषेध करत आहोत."

### नारीशक्ती विधेयकावर संताप

**‘नारीशक्ती वंदन’ विधेयक नामंजूर झाल्याच्या निषेधार्थ पिंपरी-चिंचवड महापालिकेची सर्वसाधारण सभा तहकूब करण्यात आली. महिला लोकप्रतिनिधींनी काळ्या साड्या परिधान करून तीव्र निषेध नोंदवत काँग्रेसवर जोरदार टीका केली. या विधेयकामुळे महिलांना राजकारणात मोठी संधी मिळाली असती, मात्र ते फेटाळल्याने महिलांचा अपमान झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. त्यामुळे सभागृहातील कामकाज थांबवून सभा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला.**

# शहरात भटक्या श्वानांचा आजार वाढतोय!

## लसीकरण मोहीम सुरू; नागरिकांकडून श्वान नियंत्रणाची महापालिकेकडे जोरदार मागणी

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी शहरातील गांधीनगर परिसरात भटके श्वान आजारी पडण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. महापालिकेकडून भटक्या श्वानांचा बंदोबस्त होत नसल्याने शहरात आजारी श्वानांची संख्या वाढत आहे. त्याचा फैलाव इतर भागांत होऊ नये यासाठी लसीकरण मोहीम महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने हाती घेतली आहे. तसेच येथील मोकाट श्वानांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.**



गांधीनगर, खराळवाडी गावठाण, आत्मनगर, बजरंगनगर, कामगारनगर, विठ्ठल रखुमाई मंदिर, कर्मयोग सोसायटी, युनायटेड चर्च, सुदर्शन चौक, चांदणी चौक या परिसरात काही भागांत भटके श्वान आजारी पडल्याच्या घटना दिसून आल्या आहेत. शहरात मोकाट श्वानांची वाढती संख्या नागरिकांना धोकादायक ठरत आहे. भटके श्वान आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. या भटक्या श्वानांच्या आजारावर वेळीच उपचार आणि लस घेतली नाही, तर शहरातील अनेक भटके श्वान मोठ्या संख्येने आजारी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

श्वानप्रेमींकडून श्वान दगावल्यास संबंधितांना वेठीस धरले जाते. मात्र, श्वानदंशने मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या घरी श्वानप्रेमी जातात का, असा संतप्त सवाल पीडित नागरिक करीत आहेत. महापालिकेने संबंधित यंत्रणांवरही श्वानप्रेमी संघटनांचा दबाव असल्याने श्वानांबाबत कारवाई करण्यावर दबाव येत असल्याचे सांगण्यात येते. मोकाट श्वान पकडलेही जात नाहीत, तसेच त्यांची नसबंदी केली जात नसल्याने श्वानांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.

लसीकरण केल्यानंतर श्वान निरोगी राहण्यास मदत होते. त्याचा प्रादुर्भाव इतरांना होत नाही. अंगावरील केस गळणे, गोचीड होणे, खरुज खाज येणे या आजारांपासून संरक्षण मिळते. हे लसीकरण ज्या ठिकाणाहून तक्रार केली जाते त्या लोकेशनवर जाऊन रोगप्रतिकारशक्ती लस देण्यात येते. यामुळे भटके श्वान आजारी पडण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. यासाठी फिरते डॉग ॲम्बुलन्स वाहन प्रभागात जाऊन लसीकरण करते.

### सर्व प्रभागात भटक्या श्वानांसाठी लस उपलब्ध

आजारी श्वानाची तक्रार केल्यानंतर त्याठिकाणी फिरते डॉग ॲम्बुलन्स पथक जाऊन लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून देते. लसीकरण केल्यानंतर श्वान निरोगी राहण्यास मदत होते. त्याचा प्रादुर्भाव इतरांना होत नाही. शस्त्रक्रिया करण्यासाठी किंवा उपचारासाठी दाखल करण्याची व्यवस्था नेहरूनगर येथे करण्यात आली आहे. या मोहिमेत पशुधन पर्यवेक्षक अतिष कुराडे, डॉक कॅचर कुमार साखरे, वाहनचालक नीलेश शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित लसीकरणाची मोहीम गांधीनगर येथील दुर्गामाता मंदिर, भवानी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार येथे राबविण्यात आली. हे लसीकरण ज्या ठिकाणाहून तक्रार केली जाते त्या लोकेशनवर जाऊन रोगप्रतिकारशक्ती लस देण्यात येते. अशी माहिती लसीकरण मोहिमेतील कर्मचाऱ्यांनी मध्यमाशी बोलताना दिली.

> निरोगी राहण्यासाठी डॉगची तक्रार प्राप्त झाल्यानंतर लगेचच त्या ठिकाणी जाऊन लस दिली जाते. एक फिरते डॉग ॲम्ब्युलन्स प्रभागात उपचारासाठी फिरत असून, दुसरी फिरते डॉग ॲम्ब्युलन्स पिंपरी चिंचवड शहरात विविध ठिकाणी फिरत असून, आजारी श्वानांवर तिथे जाऊन लसीकरण केले जाते.
>
> **डॉ. निरज हटवार,** पशुवैद्यकीय अधिकारी, महापालिका

# महिलेचे मॉर्फ केलेले न्यूड फोटो व्हायरल करण्याची धमकी

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**डिजिटल युगात सोशल मीडियाचा वापर झपाट्याने वाढत असताना सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही चिंताजनकरीत्या वाढत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. पिंपरी परिसरात एका तरुणाला लक्ष्य करत त्याच्या होणाऱ्या पत्नी व आईचे मॉर्फ केलेले न्युड फोटो पाठवून तब्बल पाच लाख रुपयांची खंडणी मागण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.**



याप्रकरणी पीडित तरुणाने रावेत पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ कारवाई करत ऋषीकेश शिंदे (रा. हिंजवडी) याला अटक केली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आरोपीने अत्यंत नियोजनपूर्वक हा गुन्हा केल्याचे दिसून येत आहे.

आरोपीने विविध मोबाइल क्रमांकांचा वापर करून फिर्यादी, त्यांची होणारी पत्नी तसेच त्यांच्या मित्रपरिवाराला मॉर्फ केलेले अश्लील फोटो पाठवले. हे फोटो इतके वास्तवदर्शी बनवले गेले होते की, पाहणाऱ्यांना ते खरे असल्याचा भास होत होता. या माध्यमातून आरोपीने पीडित व्यक्तीवर मानसिक दबाव आणण्याचा प्रयत्न केला.

इतकेच नव्हे तर आरोपीने हे फोटो काही अश्लील वेबसाईटवर अपलोड केल्याचा दावा करत ते हटवून टाकण्यासाठी पाच लाख रुपयांची खंडणी मागितली. "जर पैसे दिले नाहीत, तर हे फोटो अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवले जातील," अशी धमकी देत आरोपीने पीडित कुटुंबाला भयभीत केले. या प्रकारामुळे संबंधित कुटुंबाला मोठा मानसिक त्रास सहन करावा लागला असून सामाजिक बदनामीही झाली आहे.

या प्रकरणातून सायबर गुन्हेगार किती चलाख आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम झाले आहेत, याचे स्पष्ट उदाहरण समोर आले आहे. साध्या फोटो एडिटिंग तंत्रज्ञानाचा वापर करून कोणाच्याही प्रतिमेला धक्का पोहोचवता येऊ शकतो, यामुळे सामान्य नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे.

पोलिसांनी आरोपीला अटक करून त्याच्याकडील मोबाइल फोन, सिमकार्ड आणि इतर डिजिटल पुरावे जप्त केले आहेत. या माध्यमातून आरोपीने अजून किती जणांना अशाच प्रकारे ब्लॅकमेल केले आहे, याचा तपास सुरू आहे. तसेच संबंधित अश्लील वेबसाईट्सवरून फोटो हटवण्यासाठीही सायबर सेलच्या मदतीने कार्यवाही केली जात आहे.

दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, सोशल मीडियावर आपली वैयक्तिक माहिती आणि फोटो शेअर करताना काळजी घ्यावी. तसेच कोणत्याही संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये आणि अशा प्रकारची घटना घडल्यास त्वरित सायबर हेल्पलाईन किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा.

दरम्यान, या घटनेमुळे सायबर सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून डिजिटल जगात सुरक्षिततेसाठी जागरूकता आणि सतर्कता हीच सर्वात मोठी गरज असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### सायबर तज्ज्ञ काय सांगतात?

अशा प्रकारच्या घटनांमध्ये घाबरून जाऊन पैसे देण्याऐवजी त्वरित पोलिसांकडे तक्रार करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण एकदा पैसे दिल्यानंतर आरोपी अधिक मोठ्या रकमेची मागणी करण्याची शक्यता वाढते. तसेच कोणत्याही अनोळखी क्रमांकावरून येणाऱ्या अशा प्रकारच्या संदेशांकडे दुर्लक्ष करणे आणि त्यांची नोंद ठेवणे महत्त्वाचे आहे.

# शहरात ओला कचरा स्वतः जिरवा; अन्यथा दंड

## महापालिकेचा इशारा; 100 किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण करणाऱ्यांवर कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील दररोज 100 किलोपेक्षा अधिक ओला कचरा निर्माण करणाऱ्या हाऊसिंग सोसायट्या, रुग्णालये, हॉटेल्स, शैक्षणिक संस्था, मंगल कार्यालये, कॅण्टीन, वसतिगृह, कंपन्या आणि मोठ्या आस्थापनांना महापालिका आरोग्य विभागाने पुन्हा एकदा ओला कचरा स्वतःच्या परिसरातच जिरविण्याचा इशारा दिला आहे. एक एप्रिलपासून घनकचरा व्यवस्थापन नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी सुरू झाल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.**




केंद्र शासनाच्या 27 जानेवारी 2026 च्या अधिसूचनेनुसार, प्रतिदिन 100 किलोपेक्षा जास्त ओला कचरा निर्माण होणाऱ्या किंवा मोठ्या क्षेत्रफळ, पाण्याचा अधिक पाणी वापर असलेल्या आस्थापनांनी कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प उभारणे बंधनकारक आहे. नियमांचे पालन न केल्यास पहिल्यांदा 5 हजार रुपये, तर दुसऱ्यांदा 15 हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्याला जाणार आहे. महापालिकेच्या आकडेवारीनुसार, शहरातील 233 हाऊसिंग सोसायट्यांनी स्वतःच ओला कचरा जिरविण्याची व्यवस्था उभी केली आहे.

तयार होणारे खत त्यांच्या बागा आणि हरित पट्ट्यांसाठी वापरले जाते. मात्र, अजूनही 877 सोसायट्यांमधून महापालिकाच ओला कचरा उचलत आहे. सोसायट्यांमधून दररोज 288 टन कचरा निर्माण होत असल्याने, त्याचा ताण महापालिकेच्या यंत्रणेवर पडत आहे. वारंवार नोटीसा देऊनही कंपोस्ट खत प्लांट सुरू न केल्याने गेल्या वर्षभरात 101 हाऊसिंग सोसायट्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यात केवळ 35 हजार रुपये दंडाची वसुली झाली. यापूर्वीही नोटिसा, मुदतवाढ आणि काही ठिकाणी नळजोड तोडण्याच्या कारवाया करण्यात आल्या होत्या.

शहरात ओला कचरा स्वतः जिरवणाऱ्या हाऊसिंग सोसायट्या सद्यस्थितीत 233 आहेत, तर महापालिका अजूनही कचरा उचलते त्या हाऊसिंग सोसायट्या 877 इतक्या आहेत. वर्षभरात 101 सोसायट्याना नोटिसा दिल्या असून, 35 हजार रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. सोसायट्यांमधून दररोज निर्माण होणारा कचरा 288 टन इतका आहे.

### कंपोस्ट खत प्रकल्प न उभारल्यास दंडात्मक कारवाई

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने 27 जानेवारी 2026 रोजी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे या नियमात बसणाऱ्या हाऊसिंग सोसायट्या व आस्थापनांना ओला कचरा जिरविणे बंधनकारक आहे. त्यांनी तसे न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, असे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

### सहा वर्षांपासून रखडली अंमलबजावणी

केंद्र व राज्य शासनाच्या आदेशानुसार सन 2019 पासून महापालिकेकडून या घनकचरा व्यवस्थापन नियमावलीची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यापूर्वी आरोग्य विभागाने सोसायट्यांना नोटिसाही बजावल्या होत्या. वेळोवेळी मुदत दिली. परंतु, हाऊसिंग सोसायट्या व राजकीय दबावातून कारवाईबाबत प्रशासनाने माघार घेतली. मागील वेळेत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी हस्तक्षेप करत ती सक्ती काही काळ रोखली होती. आता प्रशासनाने पुन्हा सोसायट्यांना इशारा दिला आहे.

# ‘नो पार्किंग’ फलक पदपथावर आडवा



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

चापेकर चौक ते आकुर्डी मुख्य रस्त्यावर डाव्या बाजूच्या पदपथावर लावलेला ‘नो पार्किंग’चा फलक बसच्या धडकेमुळे वाकून थेट पदपथावर आडवा पडला आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना चालताना अडथळा निर्माण झाला असून, ही परिस्थिती धोकादायक ठरत आहे. तिरक्या अवस्थेत पदपथाच्या मधोमध हा फलक आल्याने नागरिकांना चालता येत नाही. परिणामी अनेकांना मुख्य रस्त्यावरून चालावे लागत असून, अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येकडे संबंधित विभागाने तातडीने लक्ष देऊन फलक काढून घेणे किंवा पूर्वस्थितीत सरळ करणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# शहरातील अनधिकृत अतिक्रमणांविरोधात कारवाई अधिक सक्त

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांनिहाय करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात धडक निष्कासन कारवाईचा सविस्तर आढावा आज महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतला. त्यानंतर त्यांनी शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात कारवाई अधिक सक्त करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.**




महापालिका आयुक्त यांच्या कार्यालयात झालेल्या या बैठकीला अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त राजेश आगळे, अण्णा बोदडे, अतिक्रमण विभागाचे मुख्यालय उपायुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, राजाराम सरगर, अजिंक्य येळे, तानाजी नरळे, किशोर ननवरे, पूजा दुधनाळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी बैठकीमध्ये अनधिकृत बांधकाम, अतिक्रमण कारवाई, नाल्यावरील अतिक्रमण निर्मूलनचा सविस्तर आढावा घेतला. तसेच अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात प्रास्तावित कारवाईची माहिती देखील आयुक्त डॉ.सूर्यवंशी यांनी घेतली. आयुक्त डॉ. सूर्यवंशी म्हणाले, पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर कठोर कारवाई करण्यात यावी. या कारवाईचा नियमित आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित पाहणी करावी. जे फेरीवाले रस्त्यावर स्टॉल लावतात, त्यांच्यावर देखील कारवाई करावी. नागरिकांच्या सुरक्षेच्या तसेच शहराच्या नियोजनबद्ध विकासाच्या दृष्टीने ही कारवाई अधिक प्रभावीपणे राबविण्यात यावी. नागरिकांनीही नियमांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.

# SPG इंटरनॅशनल पब्लिक स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के

## शिक्षण विश्व : शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा थाटा-माटात सत्कार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**येथील नामांकित 'SPG इंटरनॅशनल पब्लिक स्कूल'ने दरवर्षीप्रमाणे यंदाही आपल्या शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या CBSE इयत्ता दहावीच्या परीक्षेत शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या २४ विद्यार्थ्यांचा विशेष गौरव सोहळा शाळेच्या प्रांगणात उत्साहात पार पडला.**




कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी पांडुरंग नाना गवळी , सुनिता माई गवळी, स्वप्नील गवळी, कोमल गवळी, संकल्प गवळी आणि डॉ जयश्री सुरवसे*यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेचे प्राचार्य डॉ. प्रवीण गायकवाड यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले.

यशाचे मानकरी : या परीक्षेत शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. यात प्रामुख्याने: स्नेहा देओकर : ९६.६% (प्रथम क्रमांक), योगिनी दुकारे : ९६% (द्वितीय क्रमांक), अतिक शेख : ९६% (तृतीय क्रमांक), शिवराज तापकीर : ९५.६% (चतुर्थ क्रमांक), श्रेया बॅनर्जी : ९५.४% (पाचवा क्रमांक), एकूण २४ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन श्रीमती सोनल तांबे यांनी केले, तर आभार प्रदर्शनाने व समूह छायाचित्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या सोहळ्यामुळे भोसरी परिसरात शाळेच्या शैक्षणिक यशाचे कौतुक होत आहे.

याप्रसंगी बोलताना श्री. स्वप्नील गवळी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत म्हटले की, "दहावीचा निकाल हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा असतो. SPG इंटरनॅशनल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश केवळ त्यांचेच नव्हे, तर त्यांच्या पालकांच्या विश्वासाचे आणि शिक्षकांच्या0 सातत्यपूर्ण परिश्रमाचे फळ आहे. शाळेने दिलेले दर्जेदार शिक्षण आणि शिस्त यामुळेच ही उज्ज्वल यशाची परंपरा कायम आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस माझ्या मनापासून शुभेच्छा."

### तज्ञांचे मार्गदर्शन

शाळेचे प्राचार्य डॉ. प्रवीण गायकवाड यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिमान व्यक्त करतानाच, या यशात शिक्षक आणि पालकांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगितले. डॉ. जयश्री सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना पुढील करिअरच्या निवडीबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शाळेने दिलेल्या संस्कारांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. "विद्यार्थ्यांनी आयुष्यात मोठी स्वप्ने पहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करावेत, शाळा सदैव तुमच्या पाठीशी आहे, असेही डॉ. प्रवीण गायकवाड यांनी म्हटले आहे.






# Crescendo नाट्यस्पर्धेत MIT महाविद्यालयाचा दणदणीत विजय

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'Crescendo' या आंतरमहाविद्यालयीन नाट्यस्पर्धेत MIT कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.**




या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'फ्लॅट नं. ५०४' हे नाटक सादर करत उत्कृष्ट अभिनय, लेखन आणि प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर प्रेक्षकांची मने जिंकली. स्पर्धेत महाविद्यालयाने सांघिक प्रथम क्रमांक पटकावला. तसेच, नाटकाचे लेखक संपत शेट्टी यांना प्रथम क्रमांक, तर दिग्दर्शक अथर्व कांबळे यांनाही प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळाला. या यशाबद्दल महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. बी. बी. वाफारे, डीन स्टुडंट्स अफेअर्स डॉ. सुनील महाजन तसेच सांस्कृतिक समन्वयक निशिगंधा भालेकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या कामगिरीचे कौतुक केले. या यशामुळे महाविद्यालयाच्या सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.